

2012-13

FOR THE UPLIFTMENT OF THE MASSES
SHRI SHIVAJI MARATHA SOCIETY'S
**SAMAJ BHUSHAN BABURAO alias APPASAHEB JEDHE**
**ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE**
425, SHUKRAWAR PETH, PUNE - 411 002.
OFF. : (020) 24477335, FAX :- (020) 24450936
Prof. V. H. KACHARE
M.A. M. Phil (Eco.)
Acting Principal
Email : jedhe_c@rediffmail.com Visit our website : www.jedhecollege.com
ACCREDITED BY NAAC 'B' GRADE



EST : 1984 - AFFILIATED TO PUNE UNIVERSITY - IDNT NO. PU/PN/ACS/063/1984/RECOGNISED BY U.G.C. U/S 2(f) & 12 (B)

Outward No. Date : 27.12.12

# सूचना

सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींनी सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासन उच्चतंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २०१२/ प्र. क्रं. २१६/१२/विशि - १ मंत्रालय मुंबई दि.२३ ऑक्टोबर २०१२ नूसार -

राज्यातील महाविद्यालये व शैक्षणिक संस्थामध्ये स्त्री-पुरूष समानतेची बीजे रूजविण्यासाठी जागर जाणीवांचा चा अभियानांतर्गत महाविद्यालयात संबंधित विषयावर विविध कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

१. विद्यार्थी कृती गट - ( २५ विद्यार्थ्यांचा कृती गट स्थापन करणे )

२. विद्यार्थ्यांनी खालील विषयावर सूचना व निबंध लिहून द्यावयाचे आहेत.

विषय :-१. स्त्री विषयक समाजाचा दृष्टीकोन कसा असावा

२. स्त्री पुरूष समानतेचे स्वरूप

३. स्त्री चे समाजातील स्थान

४. स्त्री-सक्षमीकरण सबलीकरणांत पालकांची भूमिका

५. शैक्षणिक संस्थामध्ये स्त्रियांना पूरक वातावरण कसे असावे.

६. स्त्रियांवरील अत्याचार रोखणेबाबत समाज जागृती

७. स्त्रियांच्या समस्या आणि त्याबाबत पुरूषाची भूमिका.

८. स्त्री- पुरूष - एका रथाची दोन चाके -महत्व

९. शैक्षणिक संस्थामध्ये स्त्रियांसाठी आवश्यक सुविधा

१०. समाजातील स्त्रीयांचा परस्परांशी सुसंवाद

वरील विषयावरील चर्चासत्र दि. २१/१२/२०१२ रोजी १०.३० मि. चा महाविद्यालयाच्या हॉलमध्ये घेण्यात येईल.

तसेच संबंधित विषयावरील ५०-६० शब्दांत सूचना /उपाय विद्यार्थ्यांकडून स्वीकारल्या जातील तसेच निबंध ५०० शब्दांत लिहून दि. ०२ जानेवारी २०१२ पर्यंत जमा करावेत.

वरील कार्यक्रमांत विद्यार्थ्यांचा सहभाग महत्वाचा असून सर्व विद्यार्थ्यांनी वरील विषयांची नोंद घ्यावी.

सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपली नावे -खालील प्राध्यापकांकडे द्यावीत.

प्रा. वैशाली देठे.
प्रा. सौ. सावंत.
प्रा. परामिता पवार

VHKachare

सौ. व्ही. एच. कचरे
प्रभारी प्राचार्य
स भू बा. उर्फ आप्पासाहेब जेधे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
पुणे-४११००२

श्री शिवाज मराठा सोसायटीचे,

समाजभूषण बाबूराव उर्फ अप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पुणे -२

महिला तक्रार निवारण समिती

अहवाल -२०१२-१३

महिला तक्रार निवारण समितीने शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये प्रथम सत्रात एक दुसऱ्या सत्रात एक अशा दोन सभा घेतल्या समितीचा उद्देश व कामकाजाचे स्वरूप सर्व समिती सदस्यांना सांगितले तसेच विद्यार्थ्यांना सूचना काढली व ती नोटीस बोर्डवर ही लावली. तसेच सर्व प्राध्यापकांना इतर कर्मचाऱ्यांना महिला तक्रार निवारण समितीच्या कार्याबद्दल व त्यातील गांभिर्याची माहिती देऊन सर्वांनी जागरूकता दाखवावी असे आवाहन केले.

तसेच महाविद्यालयात स्त्री-पुरूष समानतेची बीजे रूजविण्यासाठी 'जागर जाणिवांचा अभियान ' अंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात आले स्त्रियांची सुरक्षितता आणि सामाजिक परिस्थिती याविषयावर दि. ३१/१२/२०१२ रोजी ११. ते १ या वेळेत विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचे चर्चासत्र आयोजित केले होते. सदर चर्चासत्रात विद्यार्थी विद्यार्थिनींनी यांनी दोन्ही बांजूनी विचार मांडले. मुलामुलींना घरातूनच समानतेचे वागणूक मिळाली पाहिजे पालकांची मानसिकता बदलली पाहिजे स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलणे आवश्यक आहे. स्त्रीला व्यक्ती म्हणून आदराने वागवणे परस्पर सहकार्य , परस्परपूरकतेची भावना जोपासने पांरपारिक मते बदलली पाहिजे स्त्री पुरूष ही रथाची दोन चाके या पध्दतीने मत परिवर्तन झाले पाहिजे अशी अनेक मते विद्यार्थ्यांनी व्यक्त केली .

वरील कार्यास समितीतील सदस्यांचे सहकार्य लाभले.

प्रा. सौ. अनुराधा सावंत
प्रमुख
महिला तक्रार निवारण समिती

डॉ. पोळ शशांक कृ.
प्राचार्य
स. भू. बा. उर्फ आप्पासाहेब जेधे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
पुणे-४११००२.

~~2013-14~~
2012-13

व्याख्यान : 'स्त्री पुरुष समानता- युवकांची भूमिका'.

वक्त्या - मा. मीना कुर्लेकर
संचालिका वंचित विकास सामाजिक
संस्था, पुणे.

दि. ३।१।२०१३ रोजी मा. मीना कुर्लेकर यांचे 'स्त्री-पुरुष - समानता- युवकांची भूमिका' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. विद्यार्थ्यांचा सहभाग चांगला होता. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. वैशाली देठे यांनी केले.

व्याख्याता मीना कुर्लेकर या वंचित विकास या संस्थेच्या संचालिका असून वेगवेगळ्या सामाजिक प्रश्नांच्या अनुषंगाने त्या कार्यरत आहेत. विद्यार्थी व ग्रामीण भागातील स्त्रिया यांचे संदर्भातील प्रश्न व त्यांची सोडवणूक यासाठी त्या काम करतात. समाज आणि सामाजिक प्रश्न याची जाण असल्याने आपल्या व्याख्यानात त्यांनी अनेक उदाहरणे दाखले देऊन स्त्री-पुरुष समानतेच्या संदर्भात युवकांची जबाबदारी महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले.

प्रश्नोत्तराच्या संदर्भात विद्यार्थ्यांचाही व्याख्यानात सहभाग होता.

कार्यक्रमाचे आभार प्रा. डी. वाय. इंगळे यांनी मानले.

विद्यार्थ्यांमध्ये समाज बांधिलकीची जाणीव निर्माण व्हावी. समाजातील प्रश्न घेऊन ते सोडविण्यासाठी स्त्रियाही महत्त्वाची भूमिका बजावतात हे विद्यार्थ्यांनी कळावे. स्त्री-पुरुष समानतेची नितांत गरज आज समाजाला आहे. स्वतःच्या कुटुंबातील स्त्रीचे स्थान काय? ते समाजातील स्त्रीचे स्थान काय आणि ते उंचावण्यासाठी स्त्रीला 'व्यक्ती' म्हणून 'माणूस' म्हणून मूल्य प्राप्त होण्यासाठी तरुण वर्गातील मुले-मुलींनी पुढे आले पाहिजे इतके पाहिजे असा विचार या कार्यक्रमातून पुढे आला.

अनेक मुले (विद्यार्थी- विद्यार्थिनी) मीना कुर्लेकर यांना भेटले व त्यांची संस्था पाहण्याचा मानस व्यक्त केला.

या कार्यक्रमात प्रा. वैशाली देठे, प्रा. डी. एम. चव्हाण, प्रा. डी. वाय इंगळे ॲड मीनाक्षी गवळे इ. उपस्थित होते. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

(signature)
(प्रा. देठे वैशाली)
समिती सदस्य)

* दि. ३१/१२/२०१२ - चर्चासत्र अहवाल. - 2012-13

'स्त्रीपुरुष समानता' जागर जाणीवांचा - अंतर्गत दि. ३१.१२.१२ रोजी विद्यार्थी विद्यार्थिनी यांचे 'एकविसाव्या शतकात स्त्रियांची सुरक्षितता आणि सामाजिक परिस्थिती' या विषयावर चर्चासत्र स. ११.०० ते ०१.०० या वेळात आयोजित केले होते.

सदर चर्चासत्रात विद्यार्थी विद्यार्थिनींनी अनेक बाजूने विचार मांडले.

1) समाजातील पालक - पालकांची मानसिकता मुला-मुलींना वाढवताना केला जाणारा भेदभाव / पक्षपात. यावर चर्चा करुन समानतेची अपेक्षा व्यक्त केली.

2) स्त्रीयांकडे पहाण्याच्या समाजाचा दृष्टीकोन - दुय्यम स्थान, उपभोगाची वस्तू, मालकी प्रस्थापित करण्याचे प्रयत्न.. यावर लक्ष वेधून - स्त्रीला माणूस म्हणून स्थान दिले पाहिजे.

3) मुलींना सबल, सक्षम, बोल्ड बनवणे आत्मसंरक्षणाचे प्रशिक्षण देऊन धीट, प्रतिकार करण्याचे विविध उपाय सूचविले - शस्त्राचा वापर, ......

4) पुरुषांची मानसिकता बदलणेकरीता प्रयत्न करणे. प्रत्येक स्त्री ही कन्या, माता, भगिनी, पत्नी इ. नात्याच्या विविध रुपात तिच्याकडे आदराने, व्यक्ती म्हणून पहावे.

5) समाजातील स्त्रीविषयीचे समज, अपसमज बदलणे गरजेचे, समाजात विशेषत: खालच्या स्तरातील स्त्रियांचे शोषण, अन्याय रोखले पाहिजेत. शिक्षणाने जागृती घडवणे.

6) शासनाची उदासिनता, कायदे, न्यायव्यवस्था कठोर निःपक्षपाती होण्याची गरज. बसमधील राखीव महिला आसन पुरुष बसतात अरेरावी करतात. यावर उपाय होत नाहीत.

7) स्त्री-पुरुषांनी पूर्वग्रहदूषित, पारंपारीक मते बदलून सहकार्य व परस्परपूरकतेची भावना जोपासली पाहीजे.

स्त्री व पुरुष ही एकाच रथाची दोन चाके या दृष्टीने महत्व.

वरील चर्चासत्राचे संयोजन प्रा. सौ. सावंत ए. ए. यांनी केले. तसेच प्रा. सौ. सावंत ए. ए. प्रा. प्रतिमा परदेशी, प्रा. वैशाली देठे यांनी मार्गदर्शन केले. या वेळी महाविद्यालयातील स्त्री व पुरुष प्राध्यापक वर्ग उपस्थित होता. विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला.

(स्वाक्षरी)
प्रा. सौ. सावंत.
म. ग. वि. स.